# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**गिर्ये रामेश्वर येथील जिल्हा परिषद शाळा इमारत मोडकळीस आल्याबाबत.**

**(१) ५६४० (०९-०४-२०१५) डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गिर्ये रामेश्वर येथील जिल्हा परिषद प्रमोशनाची इमारत मोडकळीस आल्याने विद्यार्थ्यांसाठी धोक्याची बनली असून ही इमारत पाडणे आवश्यक असल्याचे दिनांक ३ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी करुन सदर इमारत पाडण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०४-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

जिल्हा परिषद प्रमोशन या नावाची शाळा नसून जिल्हा परिषद गिर्ये रामेश्वर या नावाची शाळा आहे. ही शाळा विद्यार्थ्यांसाठी धोकादायक नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील मराठी शाळांवर प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांनी बंदीच्या कारवाईची नोटीस बजावल्याबाबत**

**(२) ५७८५ (०९-०४-२०१५) श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नविन वर्षाच्या पहिल्याच दिवशी जिल्ह्यातील १३४ मराठी शाळांवर प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांनी बंदीच्या नोटीसा बजावल्या असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शाळांवर बंदीच्या नोटीसा बजावण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, शासनाने उक्त शाळांवर घातलेली बंदी उठवून सदरील मराठी शाळेचा दर्जा वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (०४-०२-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) मराठी शाळांचा दर्जा वाढविण्यासाठी राज्यात प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र व अन्य उपक्रम राबविण्यात येत आहेत.

---

## अलिबाग (जि.रायगड) व सोलापूर जिल्हापरिषदे अंतर्गत शाळांतील कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्याबाबत

**(३) ८१६६ (०९-०४-२०१५) श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) शिक्षण विभागाकडील जिल्हानिहाय शैक्षणिक आकडेवारीनुसार जिल्हा परिषदेच्या ५०२ शाळांमध्ये १० पेक्षा कमी विद्यार्थी असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यात २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करुन त्या शाळेचे विद्यार्थी जवळच्या शाळेत वर्ग करण्यासंबंधी शासनाने आदेश दिलेले असताना सोलापूर जिल्हा परिषद, शिक्षण विभागाकडून याबाबत कोणतीच कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०४-०२-२०१९) :** (१) अंशतः खरे आहे.

रायगड जिल्हा परिषदेच्या अंतर्गत एकुण ४७७ शाळांमध्ये १० पेक्षा कमी पटसंख्या आहे.

(२) व (३) राज्यातील २० पेक्षा कमी पटसंख्येच्या शाळा बंद करण्याच्या आदेशाबाबत पुढील कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कर्जत (जि.रायगड) येथील जिल्हापरिषद शाळेत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४) ९४९७ (०९-०४-२०१५) श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) येथील जिल्हापरिषदेच्या शाळेतील शौचालय अपूर्णावस्थेत असून पिण्याची पाण्याची कमतरता तसेच शाळेच्या खिडक्यांची दुरवस्था असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्जतपासून सुमारे ७ कि.मी. अंतरावर बेकरे गाव असून या जिल्हापरिषदेच्या प्राथमिक शाळेत १२० विद्यार्थी असून अनेक सुविधांअभावी विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०४-०२-२०१९) :** (१) अंशतः खरे आहे.

१ शाळेमध्ये स्वच्छतागृहाचे बांधकाम व २ शाळांमध्ये स्वच्छतागृहाची पुनर्बांधणी सुरू आहे. खिडक्यांची तावदाने दुरूस्त करण्यात येत आहेत. पिण्याच्या पाण्याची पुरेशा प्रमाणात व्यवस्था आहे.

(२) हे खरे नाही

(३) प्रश्न उद्भवत नाही

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**तेल्हारा (जि.अकोला) तालुक्यातील वरखेड येथे वर्ग १ ते १० वीचे वर्ग नसल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याबाबत**

**(५) १३५५३ (०९-०४-२०१५) श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तेल्हारा (जि.अकोला) तालुक्यातील वरखेड गावात जिल्हा परिषदेमार्फत उच्च प्राथमिक शाळेचे ९ वी व १० वी चे वर्ग नसल्याने तसेच भैरवगड, पिंपरखड, सोगोडा येथील गावाच्या विद्यार्थ्यांची शिक्षणाकरीता गैरसोय होत असल्याची स्थानिक लोकप्रतिनिधीनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यापूर्वी पासून सतत निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार उक्त गावात सदरील वर्ग सुरु करण्याबाबवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, त्यानुषंगाने प्रस्ताव शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे पाठविण्यात आला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. ५२७ (४)

**श्री. विनोद तावडे (०४-०२-२०१९) :** (१) याबाबत निवेदन सादर झाले होते.
(२) महाराष्ट्र बालकांचा हक्क नियम, २०११ नुसार विहीत अंतरात माध्यमिक शाळा उपलब्ध असल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत नाही.
(३) व (४ ) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे व पालघर जिल्हयातील जिल्हा परिषद अंतर्गत असलेल्या प्राथमिक शाळा बंद होणार असल्याबाबत**

**(६) १५९५३ (०९-०४-२०१५) श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे व पालघर जिल्हयातील जिल्हा परिषद अंतर्गत असलेल्या ५८० प्राथमिक शाळा बंद होणार असल्याचे दिनांक १६ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शाळा बंद होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार स्थानिक विद्यार्थ्यांचा शिक्षण हक्काव्दारे विचार करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

**श्री. विनोद तावडे (०४-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनाने शिक्षकेत्तर कर्मचा-यांकरिता स्थापन केलेल्या समितीबाबत**

**(७) २२८२१ (०६-०८-२०१५) श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने शिक्षकेतर कर्मचा-यांच्या समस्या सोडविण्याकरिता समितीची स्थापना केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या समितीची अद्यापपर्यंत एकही बैठक झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

**श्री. विनोद तावडे (०६-०२-२०१९) :** (१), (२) व (३) राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांकरिता शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी सुधारित आकृतीबंधाचा शासन निर्णय दिनांक २८/०१/२०१९ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

---

**कला शारिरिक शिक्षण आरोग्य व कार्यनुभव या तीन विषयांसाठी अंशकालीन व कंत्राटी पध्दतीने पदे निर्माण केली जाणार असल्याबाबत**

**(८) २९७२१ (२१-०१-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या शिक्षण विभागाने कला व शारीरीक शिक्षण शिक्षकांच्या पदांना कात्री लावण्याचा निर्णय घेतला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कला, शारिरिक शिक्षण व आरोग्य आणि कार्यानुभव या तीन विषयांसाठी अंशकालीन व कंत्राटी पध्दतीने पदे निर्माण केली जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या या निर्णयाचा शिक्षण क्षेत्रातून निषेध नोंदविण्यात येऊन शिक्षण संघटनेने आंदोलनाचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०६-०२-२०१९) :**(१), (२), (३) व (४) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम २५ आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार नियम, २०११ मधील तरतुदीनुसार उच्च प्राथमिक शाळांमध्ये कला, शारिरीक शिक्षण व आरोग्य आणि कार्यानुभव या तीन विषयांसाठी अंशकालीन निदेशक नियुक्तीबाबत शासन निर्णय दि. ०१.०९.२०१७ रोजी निर्गमित केला आहे.

---

**राज्यात शिक्षक भरतीस बंदी असताना शिक्षकांची भरती केल्याबाबत**

**(९) ३२५४८ (२१-०१-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षक भरतीस बंदी असताना दोन हजार शिक्षकांची भरती केल्याप्रकरणी सुरु असलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार बेकायदा पदांना मान्यता देवून पदे भरणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०६-०२-२०१९) :**(१), (२) व (३) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना वैयक्तीक मान्यता देताना अनियमितता झालेल्या प्रकरणांची चौकशी आयुक्त (शिक्षण) स्तरावरुन सुरु असून दोषींविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाहीचा प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

## राज्यातील शैक्षणिक दर्जा सुधारण्याकरिता नियमात दुरुस्ती करणेबाबत

**(१०) ३९४०१ (२२-१२-२०१५) श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी शिक्षण क्षेत्रात मोठा अमुलाग्र बदल करण्यासाठी शासनाने तातडीने सात विषयात शासन निर्णय काढून बदल करण्याबाबत स्थानीक लोकप्रतिनीधीनी दिनांक २ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्री, मा. मंत्री शालेय शिक्षण यांना विनंती पत्र दिले आहे, हे खरेआहे काय,

(२) असल्यास, शासनाने या प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय?

**श्री. विनोद तावडे (०५-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात शिक्षक भरती बंद असतांना अनेक संस्थानांनी बोगस शिक्षक भरती केल्याबाबत

**(११) ३९८८४ (२५-०५-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक २ मे, २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये शिक्षक भरती बंद असतांना अनेक संस्थानी बोगस शिक्षक भरती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबधित जिल्हयातील शिक्षणाधिकाऱ्यांनी या भरतीला परवानगी दिल्याने ही भरती झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच या शिक्षक भरती कालावधीत भरती करण्यात आलेल्या शिक्षकांना देण्यात आलेल्या वेतनामुळे शासनाची झालेली नुकसान भरपाई वसुल करण्यात येणार आहे काय,

(४) तसेच राज्यातील शाळांची विद्यार्थी पटसंख्या कमी असल्याने अनेक शिक्षक अतिरिक्त आहेत हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, एकूण किती जिल्हयातील शिक्षणाधिकाऱ्यांनी शिक्षक भरतीला परवानगी दिली आहे, व या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने बोगस शिक्षक भरती संदर्भात उक्त परवानगी देण्या-या शिक्षणाधिकाऱ्यांवर व संबंधीत संस्थाचालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात आली आहे,

(६) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०४-०२-२०१९) :**(१), (२), (३), (४), (५) व (६) वैयक्तिक मान्यता देताना झालेल्या अनियमिततेच्या प्रकरणांची चौकशी आयुक्त (शिक्षण) यांच्या स्तरावर सुरु असून सदर चौकशींअंती दोषी आढळणा-या अधिकारी, कर्मचारी यांचेविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाईचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

---

**राज्यातील शिक्षणाधिकाऱ्यांनी शाळांचा शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी संख्येच्या माहितीचा रिपोर्ट प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडे सादर केला नसल्याबाबत**

**(१२) ४५००३ (२५-०५-२०१६). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ७५ हजार ३८ शाळांमध्ये विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आहेत का याची आकडेवारी शिक्षण विभागाकडे उपलब्ध नाही तसेच दिनांक ३० सप्टेंबर, २०१४ पर्यंत सर्व शाळांनी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी संख्येची माहिती (संचमान्यतेचा ऑनलाईन रिपोर्ट) विभागीय शिक्षणाधिकाऱ्यांना दिली. मात्र शिक्षणाधिकाऱ्यांनी काही शाळांचा रिपोर्ट प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडे सादर केला नसल्याने सन २०१४-१५ ची संचमान्यता होवू शकली नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या शिक्षणाधिकाऱ्यांनी संचमान्यतेचा रिपोर्ट शिक्षण संचालनालयाकडे पाठविला नाही किंवा पाठविण्यास विलंब केला अशा शिक्षणाधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, असल्यास त्याचा तपशिल काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०६-०२-२०१९) :**(१), (२) व (३) राज्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची सन २०१७-१८ ची संचमान्यता अंतिम करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

---

**राज्यातील शिक्षण संस्थातील गैरव्यवहाराला निर्बंध घालण्याबाबत**

**(१३) ५०८३५ (२५-०५-२०१६) ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शालेय शिक्षण विभागाने दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ रोजी शिक्षण हक्क कायद्याच्या अधीन राहून शिक्षण संस्थातील गैरव्यवहाराला निर्बंध घालण्यासाठी जारी केलेल्या शासन निर्णयात (जी.आर) शिक्षकामागची विद्यार्थी संख्या वाढण्याची शक्यता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिरिक्त झालेल्या शिक्षकांचे समायोजन इतरत्र करुन शासनाचा बराच पैसा वाचणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लहान शाळांमधून विद्यार्थ्यांचे योग्य सामाजिकीकरण होत नाही म्हणून लहान शाळा बंद होणे योग्य असल्याचे शासनाचे मत हे अयोग्य असुन लहान शाळेत जाणारे विद्यार्थी समाजाचे घटक का नसावेत असा प्रश्न तज्ञांकडून विचारला जात आहे तसेच, रात्रशाळा व ग्रामीण भागातील पाड्यांवरच छोट्या शाळांतील विद्यार्थ्यांचे शासनमान्य सामाजिकीकरण होत नसल्याने शिक्षणाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह लावले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, राज्यातील रात्रशाळांमध्ये पाचवी, सहावी, सातवीच्या वर्गात १०० मुले असतांना

भाषा, गणित विज्ञान व समाजशास्रांचे प्रत्येक एक शिक्षक मान्य होत असतांना तेथील तिन्ही भाषा हा एकच शिक्षक शिकवेल व त्यामुळे शिक्षणाच्या दर्जावर विपरित परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, प्रत्येक शिक्षकाचे मराठी, हिंदी व इंग्रजी या तिन्ही भाषांवर प्रभुत्व असेल असे नाही, शिवाय एखाद्या दिवशी हा शिक्षक आजारी पडल्यास त्याचे वर्ग कोणी घ्यायचे याबाबत जी.आर.मध्ये स्पष्टता नाही, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत कोणते धोरण / उपाययोजना आखण्यात आली वा भविष्यात प्रस्तावित आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.?

**श्री. विनोद तावडे (०६-०२-२०१९) :** (१), (२), (३), (४), (५) व (६) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार २००९ च्या अनुषंगाने सर्व व्यवस्थापनाच्या (स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय, खाजगी अनुदानित, अंशत: अनुदानित इ. सर्व) नवीन शाळा सुरु करणे वर्ग जोडणे त्याअनुषंगाने शाळांमधील संरचनात्मक बदल करणे आणि संचमान्यता याबाबतच्या निकषात सुधारणा करणेकरीता शासन निर्णय दि. २८.०८.२०१५ रोजी निर्गमित केला आहे. उपरोक्त शासन निर्णयानुसार सद्यस्थितीत संचमान्यता केली जाते.

---

**राज्यातील सीमावर्ती भागांतील गावांमध्ये मराठी शाळा सुरु करण्याबाबत**

**(१४) ५१६६८ (१२-०५-२०१६) श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील चंद्रपूर, सांगली व नाशिक जिल्ह्यांतील सीमालगतची गावे आंध्र प्रदेश, कर्नाटक व गुजरात राज्यांच्या जवळ असून या गावांमध्ये मराठी शाळांमध्ये शिकण्याची मराठी बांधवाची इच्छा असूनही मराठी माध्यमातून शिक्षण घेण्याची पुरेशी सोय नसल्याने या भागातील विद्यार्थ्यांना इतर माध्यमातुन शिक्षण घ्यावे लागते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य शासनाचे पाच वर्षांपूर्वी (सन २०११) सीमावर्ती भागांतील ३६ गावांमध्ये मराठी शाळा सुरु करण्याचा निर्णय घेतला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सीमावर्ती भागातील सुमारे ३६ भागातील मराठी माध्यमाच्या शाळा सुरु करणेबाबत राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने दिनांक ७ ऑगस्ट, २०१३ रोजी शासन निर्णय जारी करुनही याची अंमलबजावणी होत नसल्यामुळे सीमावर्ती भागातील गावांमध्ये मराठी माध्यमाच्या एकाही माध्यमिक शाळेला माहे फेब्रुवारी २०१६ पर्यंत परवानगी दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू शासन निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी सीमाभागात मराठी शाळा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. ५२७ (९)

**श्री. विनोद तावडे (०४-०२-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) याबाबतचा प्रस्ताव तपासण्यात येत असल्याने फेब्रुवारी, २०१६ पर्यंत सीमावर्ती भागातील गावामध्ये मराठी माध्यमाच्या शाळेस परवानगी दिलेली नाही.

(४) राज्यात सन २०१३-१४ पासून स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर शाळांस परवानगी देण्यात येत असल्याने विद्यार्थ्यांना शाळांची सुविधा उपलब्ध होत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हयातील इयत्ता ११ वीच्या प्रवेशाबाबत**

**(१५) ५४१७३ (३०-११-०००२) श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयामध्ये इयत्ता १० वीची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या ५८ हजार असून, मान्यता प्राप्त असलेल्या इयत्ता ११ वी च्या वर्गातील विद्यार्थी संख्या ५६ हजार ३०० असल्याने इयत्ता ११ वीच्या प्रवेशासाठी अडचणी निर्माण झाल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर जिल्हयामध्ये इयत्ता ११ वी च्या एकूण किती तुकड्यांसाठी मान्यता प्राप्त शाळांनी परवानगी मागितली आहे,

(३) असल्यास, परवानगी मागितलेल्या पैकी किती नव्या तुकड्यांना शासनाकडून मान्यता देण्यात आली आहे, वा देण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०२-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) सन २०१६-१७ मध्ये इ.११ वी प्रवेशासाठी जिल्हयामधून १५ तुकडयांची मागणी करण्यात आली होती. त्यामधील एकूण १४ तुकडयांची मागणी मान्य झाली. सदर मान्य झालेल्या तुकड्यांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश दिला होता. तसेच इ.१० वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांपैकी काही विद्यार्थ्यांनी आय.टी.आय व तंत्रनिकेतन मध्ये प्रवेश घेतला. सबब सन २०१६-१७ मध्ये इ.११ वी प्रवेशाबाबत कोणतीही अडचण आली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक आणि पर्यवेक्षकांसहीत शिक्षकांच्या समायोजनाबाबत

**(१६) ५४७६७ (२४-०८-२०१६) श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.विजय भांबळे (जिंतूर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर)** :सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सन २०१५ - १६ या वर्षात जारी केलेल्या संच मान्यतेच्या निकषानुसार, राज्यातील अनेक शाळांमधील पाचवीच्या शिक्षकांची संख्या ग्राहय धरली जात नसल्याने, उपमुख्याध्यापक आणि पर्यवेक्षकांसहीत सुमारे पाच हजार शिक्षकांची पदे रद्द होणार असल्याची बाब दिनांक १३ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात लोकप्रतिनिधींनी, मालाड (पूर्व) आप्पा पाडा येथील सईबाई शाळेतील एक शिक्षक व पर्यवेक्षकाचे रदद झालेले पद पूर्ववत करणेबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांना, माहे मे २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, शिक्षण विभागाची शिक्षक संचनिश्चिती अंतिम टप्प्यात आली असून, संच मान्यता झाल्यामुळे अंदाजानुसार जिल्ह्यात ३५० हून अधिक शिक्षक तसेच पर्यवेक्षकांची १००, उपमुख्याध्यापकांची २५ ते ३० व मुख्याध्यापकांची किमान ६० पदे अतिरिक्त ठरणार असल्याचे माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, शासनाच्या दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ च्या संच मान्यतेच्या शासन निर्णयानुसार राज्यातील चार हजार शाळांच्या मुख्याध्यापकांचे पद तसेच उक्त निर्णयान्वये मुंबईसह राज्यातील रात्र शाळांसाठी अनेक शिक्षकांवर नोकरी गमावण्याची वेळ आल्याने रात्र शाळांसाठी वेगळे निकष लावण्याची मागणी शिक्षण परिषदेने शालेय मंत्री यांचेकडे दिनांक ३० मार्च, २०१६ रोजी वा त्या सुमारास केली हे खरे आहे काय,

(५) असल्यास, शाळांच्या संचमान्यतेमुळे अतिरिक्त ठरलेल्या शिक्षणसेवक, मुख्याध्यापक, शिक्षक, पर्यवेक्षक शिक्षकांचे समायोजनाविषयी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०६-०२-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) दि.२७.०५.२०१६ च्या शासन निर्णयातील उपमुख्याध्यापक/ पर्यवेक्षक पद मंजूर करताना इ.५ वीच्या वर्गामुळे मंजूर होणारी शिक्षकांची पदे देखील गृहित धरण्यात यावीत, या तरतुदीनुसार संबंधित शाळेची सुधारित ऑनलाईन संचमान्यता करण्यात येऊन पर्यवेक्षकाचे पद मंजूर करण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) रात्र शाळांच्या संचमान्यता दि.२८.०८.२०१५ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसारच करण्यात येत आहेत. दि.१७.०५.२०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार एकाच ठिकाणी काम करणारे रात्रशाळेतील कर्मचारी अतिरिक्त झाल्यास त्यांचे अन्यत्र समायोजन होईपर्यंत त्यांचे वेतन त्याच शाळेतून ऑनलाईन पध्दतीने काढण्यात येत आहे.

(५) पदे कमी होत असली तरीही त्या पदावर कार्यरत असणारे व अतिरिक्त ठरणारे मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक यांना सेवानिवृत्त होईपर्यंत त्याच ठिकाणी ठेवण्याच्या सूचना दि.१२.०७.२०१६ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित केल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्हयातील विना अनुदानीत शिक्षक कृती समितीने वेतनेत्तर अनुदान व २० पेक्षा कमी पटसंख्येखालील शाळा बंद न करण्याचा घेतलेला निर्णय

**(१७) ५८१७९ (२२-०८-२०१६) श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासन खर्चाचे कारण पुढे करुन वाडी-वस्ती वरील असलेल्या राज्यातील मंचर (जि.पुणे) कोल्हापूर,रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग तसेच नागपूर बुलढाणासह २० पेक्षा कमी पटसंख्या शाळा बंद करुन तेथील विद्यार्थ्यांना इतर शाळेत स्थलांतरीत करण्याचा निर्णय घेतला असल्याचे माहे मे,२०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यातील जिल्हा परिषदेच्या १ ते २० पटापर्यंतच्या १२४२ शाळा बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतल्याने १३९९५ विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न ऐरणीवर आल्याचे दिनांक ३ मार्च, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, बुलडाणा जिल्हयात २० पेक्षा कमी पट संख्या असणा-या सुमारे १३० शाळा व नागपूर जिल्हयातील काटोल तालुक्यात १४१ शाळा असून, त्यातील १७ मराठी शाळाची पटसंख्या कमी तसेच दोन शिक्षकी असल्याने उक्त शाळा बंद करण्यात आल्याने मराठी शाळेचे अस्तित्व धोक्यात येत आहेत हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, शासनाने वेतनेत्तर अनुदान व २० पटाखालील शाळा बंद करण्याचा निर्णय मागे न घेतल्यास कोल्हापूर जिल्हयातील विना अनुदानीत शिक्षक कृती समितीने दिनांक १५ जुलै पासून बेमुदत शाळा बंद ठेवण्याचा इशारा दिल्याची बाब दिनांक ३० मे, २०१६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आली हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शाळा बंद करु नयेत व उक्त शाळांमधील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सोयीसाठी शासन वसतीगृह तसेच विदर्यांचे व शिक्षकांचे समायोजन करणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

---

**श्री. विनोद तावडे (०४-०२-०१९०) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) नाही.

(४) याबाबत निवेदन प्राप्त झाले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उर्दु असोसिएशन अमरावती द्वारा संचालित असोशिएशन उर्दु गर्ल्स हायस्कुलची मान्यता रदद करण्याबाबत

**(१८) ६२४८३ (२२-०९-२०१६) डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

१) उर्दु असोशिएशन अमरावती द्वारा संचालित उर्दु गर्ल्स हायस्कुल, चांदणी चौक येथे मुलभूत सुविधा नसल्याने आरटीसी ॲक्ट नुसार शाळा मान्यता रदद करण्याचा प्रस्ताव माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान शिक्षणाधिकारी माध्यमिक व शिक्षणाधिकारी प्राथमिक अमरावती यांनी शासनास सादर केला आहे हे खरे आहे काय,

२) असल्यास, शासनाचे विद्यार्थ्याच्या जिवीताचे हित लक्षात घेता उक्त प्रस्तावाचे अनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०४-०२-२०१९) :**(१) अंशत: खरे आहे. याबाबतचा प्रस्ताव शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांनी शासनास सादर केला आहे.

(२) व (३) प्रस्ताव तपासून पुढील कार्यवाही प्रस्तावित आहे.

---

**राज्यात नवीन शाळांचे प्रस्ताव मंजुरीविना प्रलंबित असल्याबाबत**

**(१९) ६२९७० (२२-०८-२०१६) श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ४ हजार नवीन शाळा साठीचे प्रस्ताव मंजुरीविना पडून असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शैक्षणिक सन २०१५-१६ साठी राज्यातून २ हजार ३०० शाळांसाठी प्रस्ताव दाखल करण्यात आले होते परंतु या प्रस्तावामध्ये वारंवार त्रुटी दाखवून मान्यता नाकारली होती तसेच जवळपास १ हजार २५० शाळांची यादी प्रलंबित ठेवण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या सर्व शाळांना मान्यता मिळण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०४-०२-२०१९) :** (१) सन २०१५-१६ मध्ये सुमारे ४२०० नवीन शाळेचे व दर्जावाढीचे प्रस्ताव प्राप्त झाले होते.

(२) सन २०१५-१६ मध्ये प्राप्त प्रस्तावांपैकी सर्व कागदपत्रांची पुर्तता केलेल्या १०८५ प्रस्तावांना मान्यता देण्यात आली आहे.

(३) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ मधील कागदपत्रांची पुर्तता होत असल्यास मान्यतेबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात शालेय शिक्षण विभागात नवीन सहायक शिक्षकांच्या भरतीवर बंदी आणल्याबाबत**

**(२०) ६३४९७ (२२-०८-२०१६) श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वत्र शालेय शिक्षण विभागात नवीन सहायक शिक्षकांच्या भरतीवर शासनाद्वारे बंदी आणण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ६ जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास शासनाच्या शिक्षण विभागाचे उपसचिव यांचेद्वारा शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद चंद्रपूर यांना पत्र क्र.संकीर्ण-२०१६/सं.क.१५३/१६/टीएनटी-२ अन्वये रिक्त पदे भरण्यासाठी परवानगी दिली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने शासकीय नियमांना डावूलन शिक्षक भरती प्रकरणी जिल्हा शिक्षणाधिकारी यांचेसह संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०६-०२-२०१९) :** (१), (२), (३) व (४) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आणि राज्यातील खाजगी अनुदानित/अंशत: अनुदानित व विनाअनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची पदे भरण्याकरिता शासन निर्णय दि.२० जून, २०१४ अन्वये कार्यपध्दती विहीत करण्यात आलेली आहे. उपरोक्त कार्यपध्दतीच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत दि.०६ जून, २०१६ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

---

**बृहन्मुंबईतील विविध महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांना सूर्य नमस्कार सक्तीचे करण्यात आल्याबाबत**

**(२१) ६५४७१ (०५-०१-२०१७) श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषतः बृहन्मुंबईतील विविध महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांना सूर्य नमस्कार सक्तीचे करण्याला केलेल्या विरोधाबाबत स्थानिक जनप्रतिनिधी तसेच सामाजिक कार्यकर्ते यांनी संबंधित शैक्षणिक संस्थांना, राजकीय तसेच पदाधिका-यांच्या दिनांक १ ऑक्टोंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आणले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित प्रकरणी शालेय शिक्षण विभागाच्यावतीने तसेच जनप्रतिनिधी व जागृत नागरिकांच्या संघटनेने विरोध दर्शवून तसेच वेळोवेळी निदर्शनास आणूनही पाहिजे तशी दक्षता घेतली गेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे, व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०५-०२-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनात पारदर्शकता आणण्यासाठी शिक्षकांच्या रिक्त पदांचा आढावा घेण्याबाबत**

**(२२) ६७०५२ (०५-०१-२०१७) श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनात पारदर्शकता आणण्यासाठी शासनाने राज्यभरातील शिक्षकांच्या रिक्त पदांचा आढावा घेण्याचे काम सुरु केले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यातील अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाचे आदेश निघाले असतानाही त्या शिक्षकांना संस्था रुजू करुन घेत नसतील तर संबंधित संस्थांमधील शिक्षकपद रद्द करण्याचे आदेश शालेय शिक्षण विभागाने दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास दिल्याचे निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अतिरिक्त शिक्षकाचे समायोजन ऑनलाईन पध्दतीने केले जात असल्याने राज्यातील विद्यार्थ्यांच्या पटसंख्येनुसार शाळेतील शिक्षकांच्या संख्या शालेय शिक्षण विभागाने निश्चित केल्यानंतर त्याप्रमाणे शिक्षक आणि कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्यासाठी शासनाकडून मागविण्यात आलेली रिक्त पदांची माहिती अनेक शिक्षण संस्थांनी शासनाने दिलेल्या मुदतीत दिली नाही तर त्या संस्थावर कायदेशीर फौजदारी कारवाई करण्यात येईल असा निर्णय शालेय शिक्षण विभागाने दिनांक १७ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास घेऊन खासगी अनुदानीत व विना अनुदानीत शाळा संस्थांना कळविला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, माहे ऑगस्ट, २०१५ च्या संचमान्यतेच्या शासन निर्णयामध्ये त्रुटी असल्याने समायोजन योग्य ठरणार नसल्याने राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा मुख्यध्यापकांनी या समायोजनेच्या प्रक्रियेवर बहिष्कार घातल्याचे निदर्शनास आणले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच दिनांक ०८ सप्टेंबर २०१६ रोजी वा त्यासुमारास ठाणे जिल्ह्यातील प्राथमिक शाळेतील अतिरिक्त ठरलेल्या १५४ शिक्षकांपैकी केवळ ३३ जागा रिक्त असून १२१ प्राथमिक शिक्षकांनी इतर जिल्ह्यामध्ये हजर राहण्याचे आदेश शिक्षण विभागाने दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास,शासनाने नाशिकसह राज्यातील एकूण अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांची व रिक्त पदांची तसेच माहे नोव्हेंबर,२०१६ पर्यंत एकूण समायोजन केलेल्या शिक्षकांचा आढावा घेवून त्यांच्या समायोजनाबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०२-०२-२०१९) :** (१), (२), (३), (४), (५) व (६) राज्यातील अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. ज्या संस्था अतिरिक्त शिक्षकांना सामावून घेणार नाहीत, त्यांची पदे व्यपगत करण्याच्या सूचना शासन पत्र दि.१५.११.२०१८ अन्वये देण्यात आल्या आहेत.

**राज्यातील शिक्षकेत्तर कर्मचा-यांचा सुधारित आकृतीबंध जाहिर करण्यात येवूनही अंमलबजावणी होत नसल्याबाबत**

**(२३) ६७६०५ (२७-०१-२०१७) श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षकेत्तर कर्मचा-यांचा सुधारित आकृतीबंध जाहिर करण्यासाठी शिक्षण आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील नेमलेल्या समितीने अहवाल देऊन दीड वर्षाचा कालावधी उलटला तरीही शासनाच्या उदासिनतेमुळे त्याची अंमलबजावणी झाली नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत १३ वर्षापासून शिक्षकेत्तर कर्मचारी भरतीवर बंदी असल्याने शाळांचे प्रशासन, स्वच्छतेबरोबरच विद्यार्थी गुणवत्तेवर परिणाम होऊ लागला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त अहवालाची अंमलबजावणी करण्याबाबत तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरतीवरील बंदी उठविण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०२-०२-२०१९) :** (१), (२), (३) व (४) राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांकरिता शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी सुधारित आकृतीबंधाचा शासन निर्णय दिनांक २८/०१/२०१९ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

---

**राज्यात सीमालगत जिल्ह्यातील गावांमध्ये मराठी माध्यमातून शिक्षण घेण्याची पुरेशी सोय उपलब्ध नसल्याबाबत**

**(२४) ६७६२७ (०५-०१-२०१७) श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सीमालगत जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये मराठी भाषिक विद्यार्थी संख्येच्या मानाने मराठी माध्यमातून शिक्षण घेण्याची पुरेशी सोय उपलब्ध नसल्याने या भागात अस्तित्वात असलेल्या इतर माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण घ्यावे लागते, ही बाब गत दोन वर्षापासून शासनाच्या निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत आढावा घेण्यात आला आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, शासनाने राज्यातील सीमालगत जिल्ह्यातील गावांमधील मराठी भाषिक विद्यार्थ्यांची मराठी माध्यमातील शिक्षणाची गैरसोय होऊ नये, यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

**श्री. विनोद तावडे (०१-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) राज्यात सन २०१३-१४ पासून स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर वेगवेगळया माध्यमाच्या शाळांना परवानगी देण्यात येत असल्याने विद्यार्थ्यांना शाळांची सुविधा उपलब्ध होत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील खाजगी अनुदानित शाळेतील निवड वेतनश्रेणी व शिक्षक वरिष्ठ वेतनश्रेणीचे प्रस्तावाबाबत**

**(२५) ६८५३६ (२७-०१-२०१७) श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील खाजगी अनुदानित शाळेतील निवड वेतनश्रेणी व वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी पात्र असणा-या शिक्षकांचे प्रस्ताव संस्था व मुख्याध्यापक यांच्या समन्वयाअभावी प्रलंबित असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सांगली जिल्हयातील अनुदानित शाळांना शाळेतील वरिष्ठ वेतनश्रेणीचे प्रस्ताव कार्यालयाकडे पाठवावेत अशा सूचना प्राथमिक शिक्षणाधिकारी यांनी दिल्या होत्या हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे?

**श्री. विनोद तावडे (०२-०२-२०१९) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) सांगली जिल्ह्यात प्राथमिक शिक्षण विभागाअंतर्गत अनुदानित शाळेतील खाजगी प्राथमिक शिक्षकांना निवड श्रेणी/वरिष्ठ श्रेणी प्रस्तावावर कार्यवाही करण्यात आलेली आहे.
सद्यस्थितीत निवडश्रेणी व वरिष्ठश्रेणी प्रस्ताव प्रलंबित नाहीत. विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे दि.३०.५.२०१८ चे पत्रानुसार वरिष्ठ श्रेणी मंजूरीचे अधिकार लेखाधिकारी वेतन व भविष्य निर्वाह पथक यांच्याकडे देण्यात आलेले आहेत.

---

## राज्यात चार हजार शाळा सुरु करण्यासाठीचे प्रस्ताव मंजूरीकरिता प्रलंबित असल्याबाबत

**(२६) ७११०८ (०५-०१-२०१७) श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात चार हजार शाळा सुरु करण्यासाठीचे प्रस्ताव मंजूरीअभावी शासनाकडे पडून असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्ताव मंजूरीअभावी प्रलंबित राहण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाना तात्काळ मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (१४-०१-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात नविन शाळाना मान्यता दिल्याने विद्यार्थ्यांची संख्या कमी होवून शिक्षक सरप्लस होणार असल्याबाबत

**(२७) ७१४०० (०५-०१-२०१७) श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नवीन शाळांना मान्यता देण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांची संख्या कमी झाल्याने शिक्षक सरप्लस होणार आहेत व दिनांक १३ जुलै, २०१६ च्या शासन निर्णयानुसार अल्पसंख्यांक शिक्षक वेतनापासून वंचित राहणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने दिनांक १३ जुलै, २०१६ च्या शासन निर्णयानुसार अल्पसंख्याक शिक्षकांवर अन्याय होणार नाही यासाठी कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. विनोद तावडे (०२-०२-२०१९) :** (१), (२) व (३) राज्यातील अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाची कार्यवाही शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार केली जाते. अल्पसंख्याक शाळांमधील शिक्षकांच्या समायोजनाची कार्यपध्दती दि.१३ जुलै, २०१६ च्या शासन निर्णयान्वये विहीत केलेली आहे.

---

**शिक्षण विभागाने पूर्व प्राथमिक, उच्च प्राथमिक व माध्यमिक असे शैक्षणिक वर्गवारी करुन विभाजन केले असल्याबाबत**

**(२८) ७१७५० (०५-०१-२०१७) श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षण विभागाने सन २०१६ पासुन शैक्षणिक वर्गवारी करुन पहिली ते चौथीचे वर्ग पूर्व प्राथमिक, पाचवी ते आठवी उच्च प्राथमिक व नववी ते दहावी माध्यमिक असे विभाजन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उच्च प्राथमिक विभागात आठवीचा वर्ग असतांना, त्यासाठी केवळ पदवीधर शिक्षकांच्या नियुक्त्या तसेच पदवीधर शिक्षक प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षकांची आवश्यकता भासणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, माध्यमिक विभागात दोन तुकड्यांसाठी तीन शिक्षकांची संच मान्यता देण्याचे निश्चित करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उच्च प्राथमिक विभागात पूर्वीच्या माध्यमिक तुकडीचा समावेश झाल्याने तसेच, माध्यमिकच्या दोन तुकड्यांसाठी तीन शिक्षक नेमण्यात आल्याने, उक्त शिक्षकांकडून माध्यमिकच्या सहा शैक्षणिक आणि तीन विशेष विषयांची शिकवणी योग्य प्रकारे होईल काय, तसेच त्यासाठी पदव्युत्तर शिक्षण व शिक्षक प्रशिक्षण (बी.एड.) शिक्षकांची गरज आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने शिक्षण हक्क अधिकार या कायद्यामध्ये फेर बदल करण्याबाबतत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०२-०२-२०१९) :** (१), (२), (३), (४), (५) व (६) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ अन्वये प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची व्याख्या शासन निर्णय दि.०२ जुलै, २०१३ अन्वये विहीत करण्यात आलेली आहे. तसेच विद्यार्थी-शिक्षक गुणोत्तर, वर्ग व विषयानुसार सुधारित संचमान्यतेचे निकष निश्चित करण्यात आले आहेत. सद्य:स्थितीत उपरोक्त दोन्ही शासन निर्णयान्वये कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**हिंगोली शहरातील आजम काफलनी परिसरातील खाजगी मान्यता प्राप्त इंग्रजी प्राथमिक शाळा बंद करण्याबाबत**

**(२९) ७२०६३ (२७-०१-२०१७) श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली शहरात आजम काफलनी परिसरात मान्यता प्राप्त असलेली स्कॉलर इंग्रजी खाजगी प्राथमिक शाळा सुरु असल्याने ती तात्काळ बंद करुन अहवाल सादर करण्याचे आदेश जिल्हाधिकारी हिंगोली यांनी शिक्षणाधिकारी यांना माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिंगोली जिल्हयात अनेक मान्यता प्राप्त नसलेल्या शाळा चालत असुन त्या शाळेवर कार्यवाही करण्यासाठी मान्यता प्राप्त असलेली स्कॉलर इंग्रजी खाजगी शाळा बंद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०१-०२-२०१९) :** (१) सदर शाळेबाबत चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे आदेश गटशिक्षणाधिकारी यांना दिले होते.

(२) सदर शाळा बंद करुन विद्यार्थ्यांचे समायोजन करण्याबाबत गटशिक्षणाधिकारी यांनी आदेश दिले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागातील सावर्डेकर लाच प्रकरणानंतर झालेल्या तपासणीबाबत**

**(३०) ७७९१७ (२०-०४-२०१७) डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागातील सावर्डेकर लाच प्रकरणानंतर झालेल्या तपासणीत दोषी आढळून आलेल्या अकरा कर्मचा-यांनी दिलेल्या खुलाश्यानुसार माध्यमिक शिक्षणाधिका-यांबाबतचा अहवाल माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान वरिष्ठांकडे पाठविण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालात काय निष्पन्न झाले आहे, त्यानुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०२-०२-२०१९) :** (१) होय,

(२) शासनपत्र दि. २८.०९.२०१८ नुसार प्रकरण बंद करण्याचा निर्णय शासनस्तरावर घेण्यात आला.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात दहावीनंतर प्रत्येक वर्षी दोन लाख विद्यार्थी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहातून दूर जात असल्याबाबत**

**(३१) ७८४८७ (२०-०४-२०१७) श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दहावीनंतर प्रत्येक वर्षी दोन लाख विद्यार्थी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहातून दूर जात असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यासुमारास शासकीय अहवालातून निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालात आणखी कोणकोणत्या बाबी निदर्शनास आल्या आहेत,

(३) असल्यास, शासनाने या अहवालानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०१-०२-२०१९) :** (१)हे खरे नाही. इ.१० वी उत्तीर्ण झाल्यानंतर साधारणत: १.८० लक्ष विद्यार्थी नियमित इ.११ वी ला प्रवेश घेत नाहीत. सदर विद्यार्थी तंत्रशिक्षण, व्यावसायिक शिक्षण, कृषि इ. अभ्यासक्रमांना प्रवेश घेतात. सदर विद्यार्थी शिक्षणाच्या मूळ प्रवाहापासून दूर गेले, असे म्हणता येणार नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शाळकरी विद्यार्थ्यांसाठी नियमित शिष्यवृत्तीचा लाभ धनादेशाद्वारे प्रत्यार्पित करण्याबाबत**

**(३२) ७९७५८ (२०-०४-२०१७) श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शालेय शिक्षणांतर्गत शिक्षण घेणाऱ्या शाळकरी विद्यार्थ्यांसाठी नियमित शिष्यवृत्तीचा लाभ वेळेवर धनादेशाद्वारे प्रत्यार्पित करण्याविषयीची मागणी राज्यातील विद्यार्थी संघटनाचे प्रतिनिधी, पालक वर्ग, सेवाभावी शैक्षणिक संस्था व त्यांचे चालक यांनी मा.मंत्री (शालेय शिक्षण), मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण), प्रधान सचिव (शालेय शिक्षण), संबंधित शिक्षण विभागाचे उपसंचालक (शालेय शिक्षण), आणि शिक्षण अधिकारी यांच्याकडे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनास या संदर्भातील माहे फेब्रुवारी, २०१७ अखेरपर्यंत किती जिल्हा शालेय शिक्षण प्रशासनाकडून वा शिक्षण उपसंचालनालय (बृहन्मुंबई, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, पुणे, कोल्हापूर, अकोला, नागपूर, लातूर) यांच्याकडून प्रस्ताव प्राप्त झाले आहे व त्यापैकी किती प्रस्तावास तत्वतः मंजुरी प्रत्यार्पित करण्यात आली आहे,

(३) असल्यास, शासनाने प्रश्नोक्त बाब (१) च्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्याचे प्रस्तावित केले आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०१-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे इयत्ता अकरावीच्या उत्तीर्णतेचे निकष बदलण्यात आल्याबाबत**

**(३३) ८०८३५ (२०-०४-२०१७) श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे इयत्ता अकरावीच्या उत्तीर्णतेचे निकष बदलण्यात आल्याने पूर्वी तीन विषयांत अनुत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्याला ३० ग्रेस गुण देवून उत्तीर्ण केले जात होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निकष बदलण्यात आल्याने बोर्डाने ग्रेस गुण १५ दिले जातील असे जाहीर केल्यामुळे अकरावीत अनुत्तीर्ण होण्याचे प्रमाण वाढू शकते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने पूर्वीचीच ३० ग्रेस गुणांची सवलत चालु ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०१-०२-२०१९) :** (१), (२) व (३) इ. १२ वी साठी विद्यार्थ्यांना उत्तीर्ण होण्यासाठी १५ अनुग्रह गुण देण्यात येत असल्याने याच धर्तीवर इ. ११ वी साठी अनुग्रह गुण ३० वरून कमी करुन १५ देण्याचा निर्णय घेतलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**विद्यार्थ्यांच्या सर्वाधिक आत्महत्या महाराष्ट्रात होत असल्याबाबत**

**(३४) ८३९०५ (२०-०४-२०१७) प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यार्थी, परिक्षेत अपयश, महाविद्यालयीन स्पर्धेचा ताण आणि कौटुंबिक अडचणी याना समोरजाताना अधिक प्रमाणात मरणाला कवटाळत असुन देशातील विद्यार्थ्याच्या सर्वाधिक आत्महत्या महाराष्ट्रात होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये प्रसिद्ध झालेल्या सन २०१५ च्या राष्ट्रीय गुन्हे विषयक सांख्यिकी अहवालात नमूद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांची कारणे काय आहेत त्या कमी होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०४-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) विद्यार्थ्यांना समुपदेशनाच्या हेतुने शिक्षकांना विशेष प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येते. विद्यार्थ्यांवर परिक्षांचा ताण येऊ नये याकरिता राज्यमंडळातर्फे समुपदेशनाची व्यवस्था करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिल्हा परिषद व नगर परिषद शांळामधील विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी होत असल्याबाबत.**

**(३५) ८४३६१ (२०-०४-२०१७) श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील जिल्हा परिषद व नगर परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांची पटसंख्या दरवर्षी मोठया प्रमाणावर कमी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठी शांळामधील गळती रोखण्यासाठी शासन प्रत्येक जिल्हा परिषद व नगर परिषदेच्या शाळामध्ये ई-लर्निंग चे वर्ग सुरु करणार असून, यासाठी निधी उपलब्ध करुन दिला जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे तसेच याबाबत शासनाचे धोरण काय आहे?

**श्री. विनोद तावडे (०२-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मोठ्या प्रमाणात लोकसहभागातून 'डिजिटल शाळा' निर्माण करण्यात येत आहेत.

तसेच ICT या योजनेंतर्गत राज्यातील सुमारे ८००० माध्यमिक शाळांमध्ये संगणक प्रयोगशाळा निर्माण करण्यात आल्या आहेत. तसेच शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याच्या हेतूने विशेष कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अल्पसंख्यांकाच्या संस्था व शाळा शिक्षण हक्क कायद्याच्या कार्यकक्षेत आणण्याबाबत.**

**(३६) ८५२२० (२१-०८-२०१७) श्री.सुनिल शिंदे (वरळी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अल्पसंख्यांकाच्या संस्था व शाळा या शिक्षण हक्क कायद्याच्या कार्यकक्षेत आणण्यासाठी नवे शिक्षण धोरण तयार करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर अंतिम निर्णय घेण्यात आला आहे काय व त्याचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे तसेच सद्यःस्थिती काय आहे?

**श्री. विनोद तावडे (०४-०२-२०१९) :** (१), (२) व (३) शिक्षण हक्क कायदा हा केंद्रशासनाने पारित केलेला असल्याने, त्यात कोणतीही सुधारणा करण्याची बाब केंद्र शासनाच्या अधिकारांतर्गत आहे.

---

**पालघर जिल्ह्यातील विद्यार्थी नववीच्या प्रवेशापासून वंचित असल्याबाबत**

**(३७) ८५६६८ (२३-०८-२०१७) ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील शाळांनी क्षमतेपेक्षा १४ हजार विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यानंतरही जिल्हयातील साडे सहा हजार विद्यार्थी हे नववीच्या प्रवेशापासून वंचित राहिले असल्याचे दिनांक २६ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापैकी अधिकतर विद्यार्थी ग्रामीण आदिवासी भागातील असल्याने सदर विद्यार्थ्यांना नाईलाजाने शिक्षण सोडण्याची वेळ आली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषदेने सर्व शाळांनी अधिकाधिक विद्यार्थ्यांना नववी मध्ये प्रवेश देण्याबाबतचे पत्र दिले असले तरी एका मर्यादेपलीकडे विद्यार्थ्यांना सामावून घेता येणार नसल्याने खाजगी शाळांनी प्रवेश बंद केल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हा परिषद शाळांमध्ये नववी व दहावी इयत्ता सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतला नसल्याने सदर विद्यार्थ्यांना खाजगी शाळांमध्ये प्रवेश घ्यावा लागत, आहे हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, ग्रामीण आदिवासी बहुल भागातील विद्यार्थ्यांना परिपूर्ण शिक्षण घेता यावे याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत हे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय असहेत?

---

**श्री. विनोद तावडे (०१-०२-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) अंशत: खरे आहे.

(४) व (५) पालघर जिल्ह्यातील ६० शाळांमध्ये सन २०१७-१८ आणि २०१८-१९ या वर्षामध्ये इयत्ता ९ वी ते १० वी चे वर्ग नाविण्यपुर्ण योजनेअंतर्गत सुरु करण्यास विशेष बाब म्हणुन शासन निर्णय, दि. ३१ जुलै, २०१७ अन्वये मान्यता दिली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनमान्य खाजगी शाळांमधील अतिरिक्त झालेल्या शिक्षकांचे समायोजनाबाबत.**

**(३८) ८५७६१ (२३-०८-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी):** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनमान्य खाजगी शाळांमधील अतिरिक्त झालेल्या शिक्षकांचे समायोजन करुन घेण्यास काही शिक्षण संस्थाचालकांचा विरोध आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून किती शिक्षकांचे समायोजन करण्यासंबंधीचे आदेश निघाले आहेत त्यापैकी किती शिक्षकांचे समायोजन झाले आहे,
(३) असल्यास, आणखी किती शिक्षकांचे समायोजन होणे बाकी आहे,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यानुसार समायोजन आदेश धुडकवणा-या किती संस्थांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०२-०२-२०१९) :** (१), (२) (३) (४) व (५) राज्यातील अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. ज्या संस्था अतिरिक्त शिक्षकांना सामावून घेणार नाहीत त्यांची पदे व्यपगत करण्याच्या सूचना शासनपत्र दिनांक १५.११.२०१८ अन्वये देण्यात आलेल्या आहेत.

---

**राज्यातील शिक्षकेत्तर कर्मचा-यांना अतिरिक्त ठरविणा-या शासन निर्णयाचा फेरविचार करण्याबाबत**

**(३९) ८७९५२ (२३-०८-२०१७) श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शिक्षकेत्तर कर्मचा-यांना अतिरिक्त ठरविणा-या दिनांक २३ ऑक्टोबर, २०१३ च्या शासन निर्णयाचा फेरविचार करण्यासाठी शासनाने माहे २०१५ मध्ये वा त्यादरम्यान राज्याचे शिक्षण आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करुन सदर समितीने दोन महिन्यात शासनास अहवाल सादर करावा असे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त समितीने राज्य शासनास अहवाल सादर केला आहे काय व त्यानुषंगाने राज्यातील खाजगी अनुदानीत माध्यमिक शाळांसाठी सुधारित आकृतीबंधाचे स्वरुप काय आहे,
(३) तसचे, आकृतीबंधाचा मसुदा व अहवाल शासनास सादर केला नसल्यास अहवाल तयार होण्यास लागणा-या विलंबामुळे हजारो शिक्षकेत्तर कर्मचा-यांची पदे अतिरिक्त व कमी होत असल्याने शिक्षक परिषदेसह शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या सर्व संघटनांनी शासनाने दिनांक २३ ऑक्टोबर २०१३ च्या शासन निर्णयाचा फेरविचार करावा व शासनाने अतिरिक्त तसेच कमी होणा-या शिक्षकेत्तर कर्मचा-यांना न्याय द्यावा अशी मागणी माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.शिक्षणमंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०२-०२-२०१९) :** (१), (२), (३), (४) व (५) राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांकरिता शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी सुधारित आकृतीबंधाचा शासन निर्णय दिनांक २८/०१/२०१९ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

---

**विद्यार्थी संख्येवर शिक्षक संख्या निश्चित करण्याच्या शासननिर्णयात दुरुस्त्या करण्याबाबत**

**(४०) ८८०१९ (२३-०८-२०१७) श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने विद्यार्थी संख्येवर शिक्षक संख्या निश्चित करण्याच्या दिनांक १८ ऑगस्ट, २०१५ व दिनांक ८ जानेवारी, २०१६ च्या शासननिर्णयात दुरुस्त्या करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णयातील दुरुस्त्यांचे स्वरुप काय आहे व त्याचा लाभ माध्यमिक शाळेतील अतिरिक्त शिक्षकांना देण्यात येणार आहे काय,

(३)असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच उक्त शासन निर्णयात दुरुस्त्या केल्याप्रमाणे अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०२-०२-२०१९) :** (१), (२), (३) व (४) सद्य:स्थितीत विद्यार्थी संख्येवर आधारित शिक्षक संख्या शासन निर्णय दि.२८.०८.२०१५ व दि.०८ जानेवारी, २०१६ मधील निकषानुसार करण्यात येते.

---

**ठाणे जिल्हयामध्ये संच मान्यतेच्या प्रक्रियेमुळे अर्धवेळ व अतिरिक्त शिक्षकांची पदे रिक्त असल्याबाबत.**

**(४१) ९०००९ (२३-०८-२०१७) श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयामध्ये शिक्षण हक्क कायद्यानुसार संच मान्यतेच्या प्रक्रियेमुळे अर्धवेळ व अतिरिक्त शिक्षकांची पदे रिक्त केल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली असून उक्त संच मान्यतेला शिक्षक संघटनांनी विरोध दर्शविला असल्याचे दिनांक ३१ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील अर्धवेळ शिक्षकांच्या पुर्णवेळ पदास मान्यता मिळेपर्यंत अर्धवेळचे वेतन सुरु ठेवणेबाबत मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे, सोलापूर, अहमदनगर यांना दिनांक २५ ऑगस्ट २०१६ रोजीवा त्या सुमारास निवेदन दिले असूनही सोलापूर जिल्हयातील अर्धवेळ शिक्षकांचे वेतन माहे जून, २०१६ पासून बंद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्नोक्त भाग (१) व (२) बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०२-०२-२०१९) :** (१), (२), (३) व (४) राज्यातील अर्धवेळ शिक्षकांच्या संदर्भात शासन निर्णय दिनांक २३.८.२०१७ अन्वये कार्यवाही करेपर्यंत संबंधितांना वेतन अदा करण्याबाबत शिक्षण संचालक यांना शासनपत्र दिनांक ३.१०.२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.

---

**मुंबईतील शाळांच्या पहिली ते चौथीच्या तुकडयांच्या मुदतवाढीच्या प्रस्तावांबाबत**

**(४२) ९१८९५ (२३-०८-२०१७) श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षण हक्क कायद्यातंर्गत (आरटीई) पायाभूत सुविधांबाबत नेमून दिलेले निकषाचे उल्लंघन करणाऱ्या मुंबईतील ४२ अनुदानित शाळांच्या पहिली ते चौथीच्या तुकडयांच्या मुदतवाढीच्या प्रस्तावांना प्रशासनाने मंजूरी दिल्याचे माहे मे,२०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, व तद्नुसार यास जबाबदार असणा-या व्यक्तीवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०१-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उदभवत नाही.

(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**हिंगोली जिल्हयातील हंगामी वस्तीगृहाच्या देयकास विलंब होत असल्याबाबत**

**(४३) ९२४३२ (१८-०८-२०१७) श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील हंगामी वस्तीगृहांची देयक देण्यास विलंब होत असून जिल्हयातील दोन तालुक्यांच्या धनादेशावर स्वाक्षरी करण्यास लेखा विभागाने नकार दिला असल्याचे माहे एप्रिल,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयात या पुर्वी सुरु असलेल्या हंगामी वस्तीगृहासाठी सर्वशिक्षा अभियानाचे मागील तीन महिन्याचा अग्रीम दिला नसल्यामुळे मुख्याध्यापकांना खर्च करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,

४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०१-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईसह राज्यातील अनेक खाजगी शाळांनी केलेली शुल्क वाढ**

**(४४) ९५४४८ (२९-१२-२०१७) श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.सुनिल शिंदे (वरळी)** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रस्थित शालेय शिक्षणासाठी सर्वसामान्य नागरिकांना खासगी शाळा वेठीस धरून अवाजवी शैक्षणिक शुल्कवाढीतून निमिष्ठाव्यतिरिक्त मर्यादेपेक्षा जास्त जाचक अटी घालत असल्याचे दिनांक १६ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, राज्यात खाजगी शाळांच्या शुल्क आकारणीवर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ हा कायदा केला असतानाही राज्यामध्ये विशेषतः मुंबई, पुणे, नाशिक इ. शहरांमधील शाळांमध्ये प्रत्येक वर्षी शुल्कवाढ होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास शाळांच्या शुल्कवाढी विरोधात पुणे, नवी मुंबई इ. ठिकाणी पालकांनी आंदोलने केली असून या कायद्याची अंमलबजावणी करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १९ मे,२०१७ रोजी वा त्यासुमारास मा. मंत्री शालेय शिक्षण यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच मुंबईसह राज्यातील, अनेक खाजगी शाळांनी, ५० ते १०० टक्के अनधिकृतपणे शुल्क वाढ केल्याप्रकरणी, राज्य शासनाने महाराष्ट्र शैक्षणिक संस्था शुल्क विनियमन अधिनियम २०११, मध्ये सुधारणा करण्यासंदर्भात शिफारशी करण्यासाठी, माजी न्यायमुर्ती व्ही.जी. पळशीकर यांच्या अध्यक्षतेखाली पुर्ननिरक्षण समिती स्थापन केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त समितीने, खाजगी शाळांनी केलेली शुल्क वाढ रोखण्यासाठी, प्रस्तुत अधिनियमात सुधारणा करणेबाबतचा अहवाल शासनास सादर केला आहे काय, असल्यास, समितीच्या उक्त अहवालातील शिफारशींचे थोडक्यात स्वरुप काय आहे व यातील किती शिफारशी शासनाने स्वीकारुन त्याची अधिनियमात तरतुद करुन सुधारणा करण्यासाठी, अध्यादेश काढण्याच्या दृष्टीने, तसेच शुल्क वाढी बाबतचा प्रश्न कायमचा निकाली लागावा याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०३-१२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

(३) सदर अधिनियमाच्या अंमलबजावणीबाबत निवेदने सादर झाली आहेत.

(४) व (५) सदर अधिनियमात सुधारणे संदर्भात शासनास शिफारशी करण्यासाठी माजी न्यायमूर्ती व्ही.जी.पळशीकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली होती.सदर समितीने अहवाल सादर केला आहे अहवालातील शिफारशीबाबत सविस्तर चर्चा व अभ्यास करुन

अधिनियमात सुधारणेबाबतचे विधेयक विधी मंडळाच्या सन २०१८ च्या पावसाळी अधिवेशनात मांडण्यात आले.तथापि हे विधेयक चर्चेसाठी आले नसल्याने पारीत झालेले नाही.या अनुषंगाने पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील खाजगी अनुदानित शाळांमधील व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्याबाबत

**(४५) ९५९६६ (२९-१२-२०१७) श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.किशोर पाटील (पाचोरा), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी अनुदानित शाळांमधील अतिरिक्त शिक्षकांचे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील शिक्षकांचे खाजगी अनुदानित शाळांमध्ये समायोजन करण्याबाबतचे धोरण शालेय शिक्षण विभागाने माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान जाहीर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू धोरणाचे स्वरुप काय आहे व त्याची अंमलबजावणी सुरु केली आहे काय, तसेच आतापर्यंत एकूण किती शिक्षकांचे समायोजन करण्यात आले वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०२-०२-२०१९) :** (१) होय हे खरे आहे.

(२) अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्याच्या ग्रामीण भागातील जिल्हा मराठी प्राथमिक शाळा पटसंख्ये अभावी बंद करीत असल्याबाबत

**(४६) ९६१६४ (२९-१२-२०१७) ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र महेता(मिरा भाईंदर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) राज्याच्या ग्रामीण भागातील जिल्हा मराठी प्राथमिक शाळांमध्ये इयत्ता पहिली ते सातवीच्या वर्गातील विद्यार्थ्यांची पट संख्या दिवसेंदिवस कमी होत असल्याने राज्यातील शिक्षण विभाग मराठी प्राथमिक शाळा बंद करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने कोट्यावधी रुपये खर्च करून बांधण्यात आलेल्या शाळा ओस पडणार असून सदर खर्च केलेला निधी वाया जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी तब्बल २४ टक्के आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने राज्यातील महापालिका व इतर ग्रामीण भागातील मराठी शाळांच्या शिक्षणाचा दर्जा वाढविण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०१-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
शासनाने राज्यातील १० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांतील विद्यार्थ्यांचे समायोजन नजीकच्या शाळेत करण्याबाबत शिक्षण आयुक्त, पुणे व शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे यांना सूचना दिल्या होत्या.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) राज्यातील मराठी शाळांचा दर्जा वाढविण्यासाठी प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र व अन्य शैक्षणिक उपक्रम शासनामार्फत राबविण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगर प्रदेशातील १७ महाविद्यालयामध्ये २०१६-१७ या शैक्षणिक वर्षामध्ये अकरावीच्या विद्यार्थ्यांना ऑफलाईन प्रवेश देण्यात आल्याबाबत**

**(४७) ९६३५५ (२९-१२-२०१७) श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगर प्रदेशातील १७ महाविद्यालयामध्ये सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षामध्ये अकरावीच्या १०५५ विद्यार्थ्यांना ऑफलाईन प्रवेश देण्यात आल्याचे प्रवेश प्रक्रियेच्या परीक्षणातून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई महानगर प्रदेशामध्ये गत वर्षी पासून अकरावीची प्रवेश प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येत असताना नियमभंग करून ऑफलाईन प्रवेश देणाऱ्या महाविद्यालयांना शिक्षण उपसंचालक यांनी नोटीस दिली असल्याचे दिनांक ३० सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ऑनलाईन प्रवेश घेतलेल्या १०५५ विद्यार्थ्यांना बारावीच्या परीक्षेला बसू न देण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला असल्याने उक्त विद्यार्थ्यांना परीक्षेपासून वंचित ठेवून त्यांचे नुकसान करण्यापेक्षा ऑफलाईन प्रवेश दिलेल्या महाविद्यालयांवर कारवाई करावी याबाबतची मागणी पालकवर्गाकडून होत आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार ऑफलाईन प्रवेश दिलेल विदयार्थ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०२-०२-२०१९) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता, सदर विद्यार्थ्यांना इ.१२ वी च्या परीक्षेस बसण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंधुदूर्ग जिल्हयातील ५ किंवा त्यापेक्षा कमी पटसंख्या असलेल्या १९१ शाळा बंद करण्याचा घेतलेला निर्णय**

**(४८) ९६९३९ (२९-१२-२०१७) श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदूर्ग जिल्हयातील ५ किंवा त्यापेक्षा कमी पटसंख्या असलेल्या १९१ शाळा बंद करण्यात येणार असल्यामुळे ३५३ शिक्षक अतिरिक्त ठरणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त शाळातील विद्यार्थ्यांची पर्यायी व्यवस्था करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०१-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील उच्च प्राथमिक शाळामध्ये अंशकालीन निदेशकाच्या नियुक्तीबाबत**

**(४९) ९९३५६ (२९-१२-२०१७) श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बालकाचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ नुसार राज्यातील उच्च प्राथमिक १८३५ शाळामध्ये कला, क्रीडा,कार्यानुभव या तीन विषयाकरिता अंशकालीन पदे निर्माण करण्यास व कंत्राटी पद्धतीने तात्पुरत्या स्वरुपात मानधनावर नियुक्ती करण्याबाबतचा निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, यांनी दिनांक १ सप्टेंबर २०१७ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने आदेशित शाळेवर अंशकालीन कला निदेशाकाची निवड व नेमणूक करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०२-०२-२०१९) :** (१) होय हे खरे आहे.
(२) सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्याच्या ग्रामीण भागातील मराठी माध्यमांच्या शाळांसाठी राज्य शासनाने तयार केलेल्या बृहत आराखडयाबाबत**

**(५०) १०१५८४ (२९-१२-२०१७) श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण हक्क अधिनियम २००९ नुसार केंद्र शासनाच्या निदेशानुसार राज्याच्या ग्रामीण भागातील मराठी माध्यमांच्या शाळांसाठी राज्य शासनाने तयार केलेल्या बृहत आराखडयाबाबतचे शा.नि.इडीई-२११६/प्र.क्र.२०/एस.एम.-२ दि. २ मार्च,२०१७ रोजीचा आदेश प्रक्रिया व प्रस्ताव रद्द करुन निर्णयाचा फेरविचार करण्याबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री,मा.शालेय शिक्षण मंत्री यांच्याकडे माहे नोव्हेंबर,२०१७ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०१-०२-२०१९) :** (१) याबाबतचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) व (३) सदर निवेदनाच्या अनुषंगाने तपासणी करण्यात येत आहे.

---

**विधान भवन :** **(जितेंद्र भोळे)**

**मुंबई.** **सचिव (कार्यभार),**

**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.